## आयुक्त तथा प्रशासक यांजकडून

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

### अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

### सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

### जाहीर प्रकटन

क्रमांक निवडणूक-१०५/सन २०२५.– महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची “ड” प्रकरण १ (निवडणूक नियम) क्रमांक ८, मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का.०५, दिनांक १५ डिसेंबर २०२५ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ ते १७ च्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मी, यशवंत डांगे, आयुक्त तथा प्रशासक तथा निवडणूक अधिकारी, सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर या जाहीर प्रकटनाद्वारे अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा खालीलप्रमाणे नमूद केलेला निवडणूक कार्यक्रम घोषित करीत आहे.

### परिशिष्ट - २

### २८, महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२५-२६

**राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का.५, दिनांक १५ डिसेंबर २०२५ सोबतचे सहपत्र.**

| अ. क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दिनांक ०१ जुलै २०२५ (मंगळवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची तारीख. | दिनांक १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दिनांक २३ डिसेंबर २०२५ (मंगळवार) ते दिनांक २९ डिसेंबर २०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३). दिनांक ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी २). (गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ व रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत). |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी | दिनांक २३ डिसेंबर २०२५ (मंगळवार) ते दिनांक ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३). (गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ व रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत). |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दिनांक ३१ डिसेंबर २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून). |

**परिशिष्ट - २** -- *चालू*

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २ जानेवारी २०२६ (शुक्रवार) पर्यंत (सकाळी ११ ते दुपारी ३). |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दिनांक ३ जानेवारी २०२६ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून). |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे. | दिनांक ०३ जानेवारी २०२६ (शनिवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक १५ जानेवारी २०२६ (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्या. ५.३० पर्यंत). |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दिनांक १६ जानेवारी २०२६ (शुक्रवार) (सकाळी १०.०० वाजल्यापासून). |
| ११ | शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे | दिनांक १९ जानेवारी २०२६ (सोमवार) पर्यंत |

मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा. क्र. ०१/निवडणूक/२०२५/१२-१२-२०२५ अन्वये सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे निवडणूक कार्यक्रमानुसार जरूर ती कार्यवाही पार पाडणेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ यांची नेमणूक केली असून मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर २०२५ चे पत्राचे अनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिका कार्यालयाचा सुधारित आदेश क्रमांक ७९, दिनांक १६ डिसेंबर २०२५ अन्वये खालील तक्ता क्रमांक १ मधील रकाना क्रमांक २ मधील अधिकाऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेला रकाना क्रमांक ६ मधील प्रभागांकरिता निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ यांना नेमणुकीचे आदेश दिले आहेत.

**तक्ता क्रमांक १**

| अ. नं. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव | पदनाम | सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव | पदनाम | सुपूर्त करावयाचा प्रभाग क्रमांक | निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ | | | |
| १ | श्री. सुधीर पाटील | उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर. | ०१. श्री. संजय शिंदे | तहसीलदार, अहिल्यानगर. | १,२,३=३ | तहसीलदार कार्यालय, मध्यवर्ती इमारत, सावेडी, अहिल्यानगर. |

**तक्ता क्रमांक १** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | श्रीमती. हेमा राजेश बडे | जिल्हा पुरवठा अधिकारी, अहिल्यानगर. | ०१. श्री. नागेश गायकवाड | तहसीलदार, (साप्र.), अहिल्यानगर. | ४,५,६=३ | प्रभाग कार्यालय, प्रभाग समिती क्रमांक १, सावेडी विभाग, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, आकाशवाणीशेजारी, सावेडी, अहिल्यानगर. |
| ३ | श्रीमती वर्षा शिवाजी पवार | उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन). | ०१.श्री. योगेश शिंदे | तहसीलदार, (भूसुधार), अहिल्यानगर. | ७,८=२ | भुसंपादन कार्यालय, टी.व्ही. सेंटर, अहिल्यानगर. |
| ४ | श्री. अनूपसिंग यादव | उपजिल्हाधिकारी (रो.हो.यो.). | ०१. श्रीमती शोभा पुजारी | तहसीलदार, (मह.), अहिल्यानगर. | ९,१०,११= ३. | जुने महानगरपालिका कार्यालयामधील आयुक्त यांचे दालन, अहिल्यानगर. |
| ५ | श्रीमती गौरी सावंत | उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन क्रमांक १५). | ०१. श्री. शितल साळवे | तहसीलदार, (संगायो), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर. | १२,१३, १४=३. | प्रभाग समिती क्रमांक ४, बुरुडगाव, अहिल्यानगर. |
| ६ | श्री. सुभाष दळवी | उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन क्रमांक १४). | ०१. श्री. हिमालय बाळकृष्ण घोरपडे | तहसीलदार, (पुनर्वसन), अहिल्यानगर. | १५,१६, १७=३ | केडगाव उपकार्यालय, केडगाव, अहिल्यानगर. |

विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. ०१/निवडणूक /२०२५/१२-१२-२०२५ अन्वये सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे निवडणूक कार्यक्रमानुसार आचारसंहिता विषयक जरूर ती कार्यवाही पार पाडणेसाठी श्रीमती सायली अशोक सोळंके यांची आचारसंहिता कक्ष प्रमुख म्हणुन व त्यांचे सहायक म्हणून इतर अधिकारी यांची नियुक्ती केली असून मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर २०२५ चे पत्राचे अनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिका कार्यालयाचा सुधारित आदेश क्रमांक ७८, दिनांक १६ डिसेंबर २०२५ अन्वये आचारसंहिता कक्षासाठी खालीलप्रमाणे नेमणूक केली आहे.

| अ.नं. | आचारसंहिता कक्ष प्रमुख यांचे नाव | पदनाम | आचारसंहिता कक्ष प्रमुख यांचे सहायक यांचे नाव | पदनाम | आचारसंहिता कक्ष प्रमुख यांच्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | आचारसंहिता कक्ष प्रमुख व त्यांचे सहायक | | |
| १. | श्रीमती सायली अशोक सोळंके | उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ३, अहिल्यानगर. | ०१. श्री. जितेंद्र शेळके | रचना सहायक, नगररचना विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका. | सभागृह नेता यांचे दालन, अहिल्यानगर महानगरपालिका मुख्य कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| | | | २. श्री. आदित्य बल्लाळ | कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका. | --,,-- |
| | | | ०३. श्री. रिझवान शेख | क्षेत्रीय अधिकारी, अहिल्यानगर महानगरपालिका. | --,,-- |

तसेच, विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.०१/निवडणूक /२०२५/१२-१२-२०२५ अन्वये सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे निवडणूक खर्च विषयक जरूर ती कार्यवाही पार पाडणेसाठी श्री. जनार्दन सहारे, जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर यांची निवडणूक खर्च हिशोब तपासणी प्रमुख म्हणून व त्यांचे सहायक म्हणून इतर अधिकारी यांची नियुक्ती केली असून मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील दिनांक १२ डिसेंबर २०२५ चे पत्राचे अनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिका कार्यालयाचा सुधारित आदेश क्रमांक निवडणूक ९०, दिनांक १७ डिसेंबर २०२५ अन्वये निवडणूक खर्च हिशोब तपासणी कक्षासाठी खालीलप्रमाणे नेमणूक केली आहे.

| अ.नं. | निवडणूक खर्च हिशोब तपासणी प्रमुख यांचे नाव | पदनाम | निवडणूक खर्च हिशोब तपासणी प्रमुख यांचे सहायक यांचे नाव | पदनाम | आचारसंहिता कक्ष प्रमुख यांच्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | निवडणूक खर्च हिशोब तपासणी प्रमुख व त्यांचे सहायक | | |
| १. | श्री. जनार्दन सहारे, | जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर. | ०१. श्रीमती सपना वसावा | मुख्यलेखाधिकारी, अहिल्यानगर महानगरपालिका. | विरोधी पक्ष नेता यांचे दालन, अहिल्यानगर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर. |
| | | | ०२. श्री. वैभव मोहनीराज जोशी | नगररचनाकार, अहिल्यानगर महानगरपालिका. | --,,-- |

उपरोक्त निवडणूक निर्णय अधिकारी हे त्यांच्याकडे निर्णयासाठी सुपूर्त करण्यात आलेल्या संबंधित प्रभागाची ( Wards) नामनिर्देशन पत्रे (Nomination Papers) रकाना क्रमांक ७ मध्ये नमूद कार्यालयात स्वीकारतील छापील नामनिर्देशन पत्रांचा संच (Set of Nomination Papers) संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहे.

**यशवंत डांगे,**
आयुक्त तथा प्रशासक तथा निवडणूक अधिकारी,
अहिल्यानगर महानगरपालिका.

अहिल्यानगर १७ डिसेंबर २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.